
ePaper

**दिल्ली हादरली! उघड्या खड्ड्याने घेतला आणखी एक जीव**



वर्ष - 9 I अंक - 162 UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज™

WWW.MAHAENEWS.COM | शनिवार, दि. 7 फेब्रुवारी 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


पान 8 वरुन...

हर्षित राणा दुखापतीमुळे स्पर्धेबाहेर?

## इंग्लंडचा धुव्वा उडवत भारतीय शिलेदारांनी सहाव्यांदा उंचावली अंडर-१९ वर्ल्डकपची ट्रॉफी

# हरारेत तिरंगा डौलाने फडकला!




**महाईन्यूज I मुंबई**

**मुंबईकर आयुष म्हात्रेच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या भारतीय संघाने अंडर-१९ वर्ल्डकप स्पर्धेत इतिहास घडवला आहे. झिम्बाब्वेतील हरारे स्पोर्ट्स क्लबच्या मैदानावर भारत आणि इंग्लंड या दोन्ही संघांमध्ये अंडर-१९ वर्ल्डकप स्पर्धेतील अंतिम सामन्याचा थरार रंगला. या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजी करताना वैभव सूर्यवंशीने १७५ धावांची वादळी खेळी केली. या खेळीच्या बळावर भारतीय संघाने पहिल्या डावात ४११ धावांचा डोंगर उभारला. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या इंग्लंडच्या फलंदाजांनी पूर्ण जोर लावला. पण भारतीय संघाने हा सामना १०० धावांनी आपल्या नावावर करून सहाव्यांदा जेतेपदाला गवसणी घातली आहे.**

### वैभव सूर्यवंशीचं विक्रमी शतक

या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजी करताना वैभव सूर्यवंशीची तुफान फटकेबाजी पाहायला मिळाली. वैभवने अवघ्या ५५ चेंडूत वेगवान शतक झळकावलं. हे या स्पर्धेच्या इतिहासातील दुसरं सर्वात वेगवान शतक ठरलं. वैभव या स्पर्धेत सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत दुसऱ्या स्थानी राहिला. इंग्लंडविरूद्धच्या सामन्यात त्याने १५ चौकार आणि १५ षटकार खेचले.



या सामन्यात भारतीय संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. हा निर्णय सुरूवातीला फसला. कारण गेल्या सामन्यातील शतकवीर आरोन जॉर्ज या महत्वाच्या सामन्यात अवघ्या ९ धावा करून माघारी परतला. पण त्यानंतर वैभव सूर्यवंशी आणि कर्णधार आयुष म्हात्रेने मिळून भारतीय संघाचा डाव सांभाळला. दोघांनी दुसऱ्या विकेटसाठी मिळून १४२ धावांची भागीदारी केली. या भागीदारीदरम्यान आयुष म्हात्रेने ५१ चेंडूत ५३ धावांची खेळी केली. तर वैभव सूर्यवंशीने अवघ्या ८० चेंडूत १५ चौकार आणि १५ षटकारांच्या साहाय्याने १७५ धावांची खेळी केली. या जोडीने भारतीय संघाला मजबूत स्थितीत पोहोचवलं. वैभव सूर्यवंशीचं दुहेरी शतक अवघ्या २५ धावांनी हुकलं. त्यानंतर वेदांत त्रिवेदी ३२ आणि विहान मल्होत्राने ३० धावांची खेळी केली. शेवटी अभिज्ञान कुंडूने ४० आणि कनिष्क चौहानने नाबाद ३७ धावांची खेळी करून संघाची धावसंख्या ९ गडी बाद ४११ धावांवर पोहोचवली.

इंग्लंडला हा सामना जिंकण्यासाठी ४१२ धावांचा डोंगर सर करायचा होता. या धावांचा पाठलाग करताना इंग्लंडलाही सुरूवातीला मोठा धक्का बसला. सलामीवीर जोसेफ मुरेस अवघ्या १७ धावा करून माघारी परतला. त्यानंतर बेन डॉकिन्स आणि बेन मेयसने मिळून इंग्लंडचा डाव सांभाळला. डॉकिन्सने ६६ धावा केल्या. तर मेयस ने ४५ धावा केल्या. पण हे दोघेही मोठी खेळी करू शकले नाहीत. शेवटी इंग्लंडकडे सामना जिंकण्याची संधी होती. पण विकेट्स शिल्लक नव्हत्या. शेवटी कॅलेब मॅथ्यू फाल्कनरने महत्वपूर्ण खेळी केली. पण तो देखील संघाला विजय मिळवून देऊ शकलेला नाही.




# मुंबई-पुणे एक्सप्रेस-वेची कोंडी सुटणार!

## दीर्घकालीन उपायोजनांसाठी स्वतंत्र अहवाल; CMनी स्वतः लक्ष घातले

**महाईन्यूज । पुणे**

**पुणे-मुंबई द्रुतगती महामार्ग सुमारे ३२ तासांनंतर मोकळा झाला. मात्र, गुरुवारी दिवसभर वाहतूक संथ गतीने सुरू होती. रासायनिक टँकर उलटल्याने झालेल्या या दुर्घटनेबाबतचा प्राथमिक अहवाल महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून (एमएसआरडीसी) तयार करण्यात आला आहे. आता दीर्घकालीन उपायोजनांसाठी स्वतंत्र अहवाल तयार करून तो मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठविण्यात येणार आहे.**



> महामार्गावरील रासायनिक वायू घेऊन जाणाऱ्या टँकरमधील वायू रात्री दीड वाजता सुरक्षितपणे दुसऱ्या टँकरमध्ये भरला. त्यानंतर हा मार्ग वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. या घटनेबाबतचा प्राथमिक अहवाल तयार करण्यात आला आहे. संकटकाळातील उपाययोजना आणि दीर्घकालीन सुरक्षिततेसाठी स्वतंत्र अहवाल तयार करून मुख्यमंत्र्यांकडे पाठविण्यात येईल.
>
> – राकेश सोनवणे, कार्यकारी अभियंता, एमएसआरडीसी

या महामार्गावर उलटलेल्या टँकरमधील वायू दुसऱ्या टँकरमध्ये भरण्याची प्रक्रिया बुधवारी रात्री दीड वाजता सुरक्षितरित्या पूर्ण करण्यात आली. त्यानंतर सुमारे ३२ तासानंतर या मार्गावरील वाहतूक सुरळीत झाली.

मात्र, दीर्घ काळापासून दोन्ही बाजूने वाहनांच्या रांगा लागल्या असल्याने वाहतूक पूर्ववत होण्यास विलंब लागला. त्यामुळे गुरुवारी दिवसभर वाहतूक मंद गतीने सुरू होती. त्यासाठी 'या घटनेबाबतचा प्राथमिक अहवाल तयार करण्यात आला आहे. आपत्तीकाळातील उपाययोजना आणि दीर्घकालीन सुरक्षिततेसाठी स्वतंत्र अहवाल तयार करून मुख्यमंत्र्यांकडे पाठविण्यात येणार आहे.' असे 'एमएसआरडीसी'चे कार्यकारी अभियंता राकेश सोनवणे यांनी सांगितले.

### 'एमएसआरडीसी'च्या प्राथमिक अहवालात काय?

टँकर अडोशी बोगद्याजवळ उलटल्यानंतर वायुची तीव्रता आणि गांभीर्यता लक्षात घेऊन महामार्गावरील नियंत्रण कक्षाद्वारे आपत्कालीन प्रतिसाद योजनेंतर्गत शीघ्र प्रतिसाद वाहने (क्विक रिस्पॉन्स), रुग्णवाहिका, डेल्टा फोर्स, पेट्रोलिंग कर्मचारी, अग्निशामक दलाचे बंब, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाची (एनडीआरएफ) तुकडी, रायायनिक तज्ज्ञांचे पथक घटनास्थळी पाठविण्यात आले. बुधवारी रात्री आठ वाजता अपघातग्रस्त टँकरमधील वायू सुरक्षितपणे दुसऱ्या टँकरमध्ये स्थानांतरीत करण्यास सुरुवात करण्यात आली. त्याच वेळी पथकाकडून वायूगळती रोखण्यासाठीही प्रयत्न सुरू होते. रासायनिक तज्ज्ञांच्या पथकाकडून वायू स्थानांतर करण्याची प्रक्रिया सावकाश आणि सुरक्षितपणे सुरू होती. त्यामुळे या प्रक्रियेला विलंब लागला. बुधवारी रात्री दीड वाजता वाजता ही प्रक्रिया पूर्ण झाल्यावर रात्री पावणेदोन वाजता दोन्ही मार्गावरील वाहतूक टप्प्याटप्प्याने सुरू करण्यात आली, असे 'एमएसआरडीसी'च्या प्राथमिक अहवालात म्हटले आहे.

# पुणे ते दिल्ली 'वंदे भारत' एक्सप्रेस सुरू होणार?

**महाईन्यूज । पुणे**

**पुण्यातून देशाच्या राजधानी दिल्लीपर्यंत पोहचण्यासाठी स्वतंत्र वातानुकुलीत, वेगवान 'प्रीमियम' श्रेणीतील अद्याप एकही रेल्वे धावत नाही. त्यामुळे या लोहमार्गावर तेजस, राजधानी एक्सप्रेस सारखी किंवा वंदे भारत एक्सप्रेस सारखी आरामदायी रेल्वे सेवा तातडीने सुरू करावी, अशी मागणी खासदार डॉ. मेधा कुलकर्णी यांनी राज्यसभेच्या शून्यप्रहर केंद्रीय मंत्री आश्विनी वैष्णव यांच्याकडे शुक्रवारी केली.**





> पुणे हे 'पूर्वेचे ऑक्सफोर्ड' म्हणून ओळखले जाते. येथील विद्यार्थी, व्यापारी आणि पर्यटकांना दिल्लीसह इतर प्रमुख शहरांशी वेगवान वाहतूक सुविधा प्राप्त होणे आवश्यक आहे. सध्याच्या परिस्थितीत प्रवाशांना मुंबईमार्गे जावे लागते किंवा जुन्या गाड्यांवर अवलंबून राहावे लागते, ज्यामुळे वेळ आणि खर्च दोन्ही वाढत असून तातडीने 'प्रीमियम' आणि वेगवान रेल्वे सेवा सुरू करावी.
>
> - डॉ. मेधा कुलकर्णी, खासदार

कुलकर्णी म्हणाल्या, 'पुणे ही सांस्कृतिक, औद्योगिक स्टार्ट अप आणि आयटी सीटी मानली जाणारे शहर म्हणून मानले जाते. प्रतिष्ठीत शिक्षण संस्था, अनुसंधान केंद्र. ऑटोमोबाईल आणि संरक्षण विभागातील मोठे उद्योग आहेत. लवकरच पुण्यात संरक्षण कॉरिडॉर साकारण्यात येत आहे. मोठया औद्योगिक आणि शैक्षणिक संस्था, केंद्र स्तरावरील कार्यालये असून व्यावसायिक आणि उद्योजक वास्तव्यास आहेत. व्यवसाय, नोकरी, शिक्षणानिमित्त अनेकजण दररोज पुणे ते दिल्ली प्रवास करतात. मात्र वेगवान, वातानुकुलित स्वतंत्र रेल्वे सेवा नसल्याने नियमित रेल्वेने प्रवास करणे जिकरीचे होते.

सध्या पुणे ते दिल्ली दरम्यान चालणाऱ्या रेल्वे गाड्या २० ते ३० तास घेतात, ज्या गर्दीने भरलेल्या असतात आणि सुविधा मर्यादित असतात. यामुळे लाखो प्रवासी, विद्यार्थी, व्यावसायिक, उद्योजक, सरकारी अधिकारी आणि सामान्य नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागतो.'

'पुणे हे वेगाने विकसित होणारे महानगर असून, दिल्लीशी थेट प्रीमियम सेवा नसल्याने प्रवाशांना वेळ आणि पैशांचा अपव्यय होतो. त्यामुळे पुणे ते दिल्ली यांच्यात वंदे भारत स्लीपर ट्रेन सुरू करावी. दिल्लीहून पुण्यात कामासाठी येणाऱ्या अनेक लोकांना याचा फायदा होईल. पुणे शहराला 'प्रीमियम' सुविधा मिळण्याची गरज आहे, असे कुलकर्णी यांनी राज्यसभेत स्पष्ट केले. त्यांनी राजधानी, वंदे भारत किंवा तेजससारख्या आधुनिक, उच्च गतीच्या ट्रेन सुरू करण्याची मागणी केली, ज्यामुळे प्रवासाचा वेळ लक्षणीयरीत्या कमी होईल आणि प्रवाशांना जगभरातील दर्जाच्या सुविधा मिळतील, असेही त्यांनी नमूद केले.

# पिंपरी-चिंचवड महापालिकेचे महापौर रवि लांडगे

## भारतीय जनता पार्टीशी निष्ठावंत कुटुंबाला मिळाली संधी



## भोसरीसह पिंपरी-चिंचवडमधून नियुक्तीचे स्वागत

**महाईन्यूज ।**
पिंपरी-चिंचवड

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या महापौरपदी श्री. रवि बाबासाहेब लांडगे यांची निवड झाली असून, त्यांच्या निवडीमुळे भोसरी परिसरासह संपूर्ण शहरात समाधान व्यक्त केले जात आहे.**



१५ ऑगस्ट १९८४ रोजी भोसरी (ता. हवेली, जि. पुणे) येथे जन्मलेल्या रवि लांडगे यांनी डी. फार्मसी पर्यंत शिक्षण पूर्ण केले आहे. मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषा त्यांना अवगत आहेत.

शेती, उद्योग व बांधकाम हा त्यांचा मुख्य व्यवसाय आहे. ते विवाहित असून त्यांच्या पत्नी सौ. श्रद्धा रवि लांडगे या पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या माजी नगरसेविका आहेत. त्यांना एक मुलगा आहे.राजकारणात सक्रिय असलेले रवि लांडगे यांनी भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाचे शहराध्यक्ष म्हणून जबाबदारी सांभाळली आहे. सन २०१७ ते २०२२ या कालावधीत ते पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे बिनविरोध नगरसेवक होते. नगरसेवक म्हणून त्यांनी प्रभागातील तसेच भोसरी विधानसभा मतदारसंघातील अनेक नागरी समस्या मार्गी लावल्या. भोसरीतील २०० खाटांच्या प्रस्तावित रुग्णालयाच्या खासगीकरणाविरोधात त्यांनी जनआंदोलन उभे करून तो निर्णय मागे घेण्यास भाग पाडले.

### सामाजिक, क्रिडा क्षेत्रात योगदान...

सामाजिक क्षेत्रातही त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. ते आनंद ग्रुप, पुणेचे संस्थापक अध्यक्ष असून कै. अंकुशराव लांडगे प्रतिष्ठान, सिद्धेश्वर युवा क्रांती मित्र मंडळ, तसेच शिव गणेश मंदिर समितीचे अध्यक्ष आहेत. गेल्या २५ वर्षांपासून अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन, दरवर्षी मोफत आरोग्य तपासणी शिबिरे, रक्तदान शिबिरे तसेच महिलांसाठी शिवणकला, पाककला व उद्योजकतेचे प्रशिक्षण देणारे उपक्रम त्यांच्या माध्यमातून राबवले जात आहेत. क्रीडा व कला क्षेत्रातही ते सक्रिय असून नियुद्ध कराटे आणि मार्शल युद्ध संघाचे अध्यक्ष आहेत. कराटे स्पर्धा, दिवाळी पहाट, होम मिनिस्टर कार्यक्रम, पुणे फेस्टिव्हल तसेच भोसरीतील सर्वात मोठ्या बैलगाडा शर्यतींचे आयोजन त्यांनी केले आहे.

### भाजपाचा राजकीय वारसा

रवि लांडगे यांना राजकीय वारसा लाभलेला आहे. त्यांचे वडील कै. बाबासाहेब आनंदराव लांडगे आणि चुलते कै. अंकुशराव आनंदराव लांडगे हे पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे माजी विरोधी पक्षनेते व भाजपचे शहराध्यक्ष होते. २००७ मध्ये चुलत्यांच्या दुर्दैवी हत्येनंतर अवघ्या २२ व्या वर्षी त्यांनी कुटुंबाची जबाबदारी स्वीकारत सार्वजनिक जीवनात सक्रिय भूमिका घेतली. नवनिर्वाचित महापौर म्हणून रवि लांडगे यांच्याकडून शहराच्या सर्वांगीण विकासासाठी भक्कम नेतृत्व मिळेल, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# पिंपरी-चिंचवड उपमहापौरपदी शर्मिला बाबर यांची निवड

**महाईन्यूज ।** पिंपरी-चिंचवड

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या माजी नगरसदस्या तथा उपमहापौर सौ. शर्मिला राजेंद्र बाबर या सामाजिक, शैक्षणिक व विकासाभिमुख कार्यासाठी ओळखल्या जातात. त्यांनी सन २०१७ ते २०२२ या कालावधीत प्रभाग क्रमांक १५, निगडी-आकुर्डी प्राधिकरण येथून भारतीय जनता पक्षाच्या वतीने नगरसेविका म्हणून प्रभावी कामगिरी बजावली.**



इतिहास विषयात एम.ए. (MASTER OF ARTS) पदवीधर असलेल्या शर्मिला बाबर यांनी महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभांमध्ये १०० टक्के उपस्थिती राखत जबाबदार लोकप्रतिनिधीची भूमिका बजावली. त्या शिक्षण समितीच्या सक्रिय सदस्य व उपसभापती राहिल्या असून शहराच्या विकास प्रक्रियेत आणि निर्णयप्रक्रियेत त्यांचा थेट सहभाग राहिला आहे.

सन २०१९-२०२० व २०२०-२०२१ या सलग दोन वर्षे त्यांनी 'अ' क्षेत्रीय कार्यालयाच्या प्रभाग अध्यक्ष म्हणून कार्य केले. तसेच त्या 'शर्मिला बाबर सखी मंच'च्या अध्यक्ष आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली विविध सामाजिक, आरोग्य व जनजागृती उपक्रम राबविण्यात आले.

निगडी-आकुर्डी प्राधिकरण परिसरात दरवर्षी रक्तदान, आरोग्य तपासणी शिबिरे, तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'मन की बात' व 'चाय पे चर्चा' कार्यक्रमांचे थेट प्रक्षेपण आयोजित करून नागरिकांशी संवाद वाढविण्यावर त्यांनी भर दिला. महिला, ज्येष्ठ नागरिक, युवक व सर्वसामान्य नागरिकांसाठी विविध शासकीय योजना प्रत्यक्षात पोहोचवण्यासाठी अर्ज भरणे, कागदपत्रे, ई-केवायसी, पेन्शन, आरोग्य सेवा, बचतगट, रोजगाराभिमुख प्रशिक्षण आदी बाबींमध्ये त्यांनी सातत्याने मार्गदर्शन केले. युवकांसाठी क्रीडा साहित्य वितरण, मैदान विकास व करिअर मार्गदर्शनावरही त्यांनी विशेष लक्ष दिले.

### माझा प्रभाग म्हणजे माझा परिवार...


"माझा प्रभाग म्हणजे माझा परिवार" या भावनेतून नागरिकांच्या प्रत्येक प्रश्नाकडे वैयक्तिक जबाबदारी म्हणून पाहणे, संकटात साथ देणे व आनंदात सहभागी होणे, हेच आपले कर्तव्य असल्याचे त्या सांगतात. त्यांच्या सामाजिक व राजकीय कार्यात पती तथा ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि भाजप मंडल अध्यक्ष राजेंद्रजी बाबर यांची त्यांना मोलाची साथ लाभली आहे. सेवा, संवेदनशीलता आणि विकास ही त्रिसूत्री जपत शर्मिला बाबर यांनी पिंपरी-चिंचवड शहराच्या सार्वजनिक जीवनात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.



## भूमिका

**राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर उत्तर देताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्यसभेत केलेल्या भाषणात काँग्रेस आणि विरोधी पक्षांवर जोरदार शब्दांत टीका केली. संविधान, लोकशाही मूल्ये आणि देशाच्या एकतेबाबत बोलण्याचा नैतिक अधिकार काँग्रेसने गमावला आहे, असा थेट आरोप पंतप्रधानांनी केला.**

# काँग्रेसमुळे संविधानाचा अवमान!





विशेषतः काँग्रेसच्या नेतृत्वावर, युवराजांच्या अहंकारावर आणि शिख समाजाबाबत दाखवण्यात आलेल्या भूमिकेवर त्यांनी कठोर शब्दांत प्रहार केला.

भाषणाच्या सुरुवातीलाच पंतप्रधान मोदी यांनी विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांच्यावर उपरोधिक टिप्पणी करत सभागृहातील गोंधळाकडे लक्ष वेधले. "तुमचं वय झालं आहे, तुम्ही बसून घोषणा दिल्या तरी चालतील, पण राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर चर्चा होऊ देत नाही, हे लोकशाहीला धरून नाही," असे ते म्हणाले. आदिवासी कुटुंबातून आलेल्या देशाच्या पहिल्या महिला राष्ट्रपतींचा काँग्रेस आणि विरोधकांनी अपमान केल्याचा आरोप करत मोदींनी विरोधकांची मानसिकता उघड केली.

लोकसभेत घडलेल्या घटनेचा उल्लेख करताना पंतप्रधानांनी काँग्रेसवर सभागृहाची गरिमा धुळीस मिळवल्याचा आरोप केला. "अध्यक्षस्थानी आसामचे सदस्य असताना कागद फेकले गेले. हा केवळ सभागृहाचा नाही तर संपूर्ण आसामचा अपमान आहे," असे त्यांनी ठणकावून सांगितले. भूपेन हजारिका यांना भारतरत्न जाहीर झाल्यावर त्यालाही विरोध करण्यात आला, हे देश विसरणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

पंतप्रधान मोदींनी काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांच्यावर थेट नाव न घेता 'युवराज' असा उल्लेख करत तीव्र टीका केली. "काँग्रेसच्या तल्लख डोक्याच्या युवराजांनी केंद्रीय रेल्वे राज्य मंत्री रवनीत सिंह बिट्टू यांना गद्दार म्हटलं. हा अहंकार किती टोकाला गेला आहे, याचं हे उदाहरण आहे," असे मोदी म्हणाले. बिट्टू हे शिख समुदायातील असून त्यांच्या कुटुंबाने देशासाठी बलिदान दिले आहे. अशा व्यक्तीला गद्दार म्हणणं म्हणजे संपूर्ण शिख समाजाचा अपमान असल्याचं मोदींनी ठामपणे मांडलं.

"शिख समाजाबाबत काँग्रेसची मानसिकता काय आहे, हे मला चांगलं माहीत आहे," असे सांगत पंतप्रधानांनी काँग्रेसच्या इतिहासावरही अप्रत्यक्ष बोट ठेवलं. शिख समाजाच्या जखमा काँग्रेसच्या काळात कशा दिल्या गेल्या, हे देश विसरलेला नाही, असा सूचक इशाराही त्यांनी दिला.

देशाच्या अर्थव्यवस्थेवर बोलताना पंतप्रधान मोदी यांनी काँग्रेसच्या कार्यकाळाची तुलना सध्याच्या सरकारशी केली. "स्वातंत्र्याच्या वेळी भारताची अर्थव्यवस्था सहाव्या क्रमांकावर होती. काँग्रेसच्या दीर्घ राजवटीत ती अकराव्या क्रमांकावर घसरली. आज आमच्या कार्यकाळात भारत तिसऱ्या क्रमांकाकडे वाटचाल करत आहे," असा दावा त्यांनी केला. कोविडनंतर जगात मोठी उलथापालथ झाली असतानाही भारताने आपली जागतिक भूमिका अधिक भक्कम केल्याचे त्यांनी नमूद केले.

दुसऱ्या महायुद्धानंतर निर्माण झालेली जागतिक व्यवस्था आता बदलत असून, नवी वर्ल्ड ऑर्डर आकार घेत असल्याचं सांगत मोदींनी भारताकडे झुकतं माप असल्याचं स्पष्ट केलं. "भारत आज विश्वमित्र म्हणून ओळखला जात आहे. विश्वकल्याणाच्या दृष्टीने भारत भूमिका बजावत आहे," असे सांगत त्यांनी विविध देशांशी केलेल्या करारांचा उल्लेख केला.

भाषणाच्या शेवटी पंतप्रधानांनी काँग्रेसवर टोला लगावत म्हटलं की, "जे लोक थकले आहेत, निघून गेले आहेत, त्यांना कधीतरी उत्तर द्यावं लागेल."

त्यांनी देशाची अशी अवस्था का करून ठेवली होती की जगातील एकही देश भारताकडे पाहायलाही तयार नव्हता." पंतप्रधान मोदींनी काँग्रेसच्या कारभारावर जोरदार हल्ला चढवला आणि देशाच्या भविष्यासाठी स्थिर नेतृत्व किती महत्त्वाचं आहे, हे अधोरेखित केलं.

## प्रासंगिक »

### शहाणपण मोठं

**दिल्ली शहरात हिराचंद नावाचा एक व्यापारी होता. सकाळी त्याचं तोंड पाहिलं की दिवस वाईट जातो, असा लोकांचा समज होता.**

ही गोष्ट अकबर बादशहाच्या कानावर गेल्यावर, त्याने हिराचंदला सकाळीच राजवाड्यात बोलावलं. योगायोगाने हिराचंद गेल्यानंतर बादशहाच्या बेगमला ताप आला, स्वतः बादशहालाही चक्कर येऊ लागली आणि दुसरी जिंकलेला प्रदेश गमावल्याची वाईट बातमी आली. या सगळ्याला हिराचंदचं दर्शन कारणीभूत आहे, असा समज करून बादशहाने त्याला फाशीची शिक्षा दिली. घाबरलेल्या हिराचंदने बिरबलाची मदत मागितली. दुसऱ्या दिवशी बिरबल वेषांतर करून सकाळी बादशहासमोर आला व पळू लागला. कारण विचारल्यावर त्याने शहाणपणाने उत्तर दिले. ते ऐकून बादशहाला आपली चूक कळली आणि हिराचंदची शिक्षा रद्द झाली.

तात्पर्य- अपशकुनांपेक्षा विवेक महत्त्वाचा आहे. अंधविश्वासामुळे निरपराधांवर अन्याय होतो, हे या गोष्टीतून दिसते. विचारपूर्वक व तर्कशुद्ध निर्णय हाच खरा न्याय आहे.

भारताच्या न्यायालयीन इतिहासात बुधवारी एक महत्त्वाची आणि अभूतपूर्व घटना घडली. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी सर्वोच्च न्यायालयात स्वतः उभे राहून युक्तिवाद केला.

# ममता बॅनर्जी थेट सर्वोच्च न्यायालयात

हे प्रकरण पश्चिम बंगालमध्ये सुरू असलेल्या मतदारसूची पुनर्सर्वेक्षण अभियानाशी (एसआयआर) संबंधित आहे. ममता बॅनर्जी या राजकीय रंगत वाढवणाऱ्या वक्तव्यांसाठी आणि कृतींसाठी ओळखल्या जातात, मात्र थेट सर्वोच्च न्यायालयात युक्तिवाद करणे हा प्रकार लक्षवेधी ठरला आहे.

सध्या केंद्रीय निवडणूक आयोगाने पश्चिम बंगालमध्ये मतदारसूची पुनर्सर्वेक्षण मोहिम हाती घेतली असून, त्यातून अनेक धक्कादायक बाबी समोर येत आहेत. पहिल्या टप्प्यात सुमारे ५८ लाख मतदारांची नावे मृत, स्थलांतरित किंवा बेपत्ता असल्यामुळे वगळण्यात आली आहेत. याशिवाय जवळपास १ कोटी मतदार संशयास्पद ठरवण्यात आले आहेत. बाप आणि मुलांच्या वयातील अत्यल्प फरक, आजोबा आणि नातवांमधील अनैसर्गिक वयोमर्यादा, तसेच एकाच व्यक्तीची शेकडो मुले दाखवण्यात येणे अशा विचित्र नोंदी आढळल्यामुळे निवडणूक आयोगाने सखोल चौकशी सुरू केली आहे.




मतदारसूचीत चुका होऊ शकतात, हे मान्य केले तरी अशा प्रकारच्या त्रुटी मोठ्या प्रमाणावर आढळल्यास त्या गंभीर ठरतात. म्हणूनच आयोगाने संशयास्पद मतदारांना नोटिसा पाठवून आवश्यक कागदपत्रांसह मतदारत्व सिद्ध करण्यास सांगितले आहे. या प्रक्रियेसाठी मोठी प्रशासकीय यंत्रणा उभी करण्यात आली असून, केंद्र सरकारनेही इतर राज्यांतील अधिकाऱ्यांची मदत घेण्याची तयारी दर्शवली आहे.

मतदारसूची स्वच्छ करणे हा केंद्रीय निवडणूक आयोगाचा घटनात्मक अधिकार आहे. कोणत्याही वैध मतदाराचे नाव चुकीने वगळले जाऊ नये आणि कोणत्याही अवैध व्यक्तीचे नाव मतदारसूचीत राहू नये, हे लोकशाहीचे मूलभूत तत्व आहे. सर्वोच्च न्यायालयानेही यापूर्वी आयोगाच्या या अधिकारांवर शिक्कामोर्तब केले आहे.

असे असतानाही ममता बॅनर्जी यांनी या अभियानाविरोधात आक्रमक भूमिका घेतल्याने अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. कारण असेच पुनर्सर्वेक्षण अभियान तामिळनाडू, उत्तर प्रदेश आणि इतर राज्यांतही सुरू असून तेथेही कोट्यवधी नावे वगळण्यात आली आहेत. मात्र त्या राज्यांतील मुख्यमंत्र्यांनी किंवा राजकीय नेत्यांनी असा थेट विरोध दर्शवलेला नाही.

ममता बॅनर्जी यांनी सर्वोच्च न्यायालयात थेट युक्तिवाद करण्याचा निर्णय घेतल्यामुळे या प्रकरणाला वेगळे राजकीय वळण मिळाले आहे. सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने त्यांचे म्हणणे ऐकून घेतले असून काही महत्त्वपूर्ण निरीक्षणे नोंदवली आहेत.

हे प्रकरण सध्या न्यायप्रविष्ट असल्याने अंतिम निर्णयानंतरच सर्व बाबी स्पष्ट होतील. मात्र एसआयआर अभियानाला ममता बॅनर्जी यांचा टोकाचा विरोध का आहे, हा प्रश्न सध्या तरी अनुत्तरितच आहे.

## ।। अभंगवाणी ।।



रामकृष्ण नाम घेता ।
चित्त होई निर्मळता ॥१॥

संकट पळती दूर ।
भक्ती वाढे अंतरी पूर ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# शरद पवार २०२२ मध्ये एनडीएमध्ये येणार होते?

## शिवसेनेचे नेते संजय शिरसाट यांचा खळबळजनक दावा

**महाईन्यूज । अमरावती**

**अजित पवार यांचं २८ जानेवारीला विमान अपघातात निधन झालं, २९ जानेवारीला त्यांना अखेरचा निरोप महाराष्ट्राने दिला. अजित पवारांच्या मृत्यूनंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाच्या चर्चा सुरु आहेत. दरम्यान शिवसेनेचे नेते आणि मंत्री संजय शिरसाट यांनी शरद पवार २०२२ मध्येच एनडीए बरोबर येणार होते असा दावा केला आहे.**



राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी पक्षाच्या विलीनीकरणाबाबत सुरू असलेल्या चर्चांना स्पष्ट शब्दांत नकार दिला आहे. माध्यमांशी बोलताना त्यांनी सध्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये कोणत्याही प्रकारचे विलीनीकरण होणार नसल्याचे ठामपणे सांगितले. या संदर्भातील चर्चा पूर्णपणे निराधार असून, पक्ष आपली स्वतंत्र राजकीय भूमिका कायम ठेवणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

तथापि, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर काही ठिकाणी राजकीय समन्वयाची शक्यता त्यांनी नाकारलेली नाही. महापालिकांमध्ये विकासाच्या दृष्टीने आणि स्थानिक पातळीवरील राजकीय वास्तव लक्षात घेता, काही जागांवर एकत्र येण्याची इच्छा अजित पवार यांनी व्यक्त केली होती, असेही तटकरे यांनी सांगितले. मात्र, याचा अर्थ विलीनीकरण असा काढू नये, असेही त्यांनी ठामपणे स्पष्ट केले.

दरम्यान, या मुद्द्यावर राजकीय वातावरण तापले असतानाच शिवसेनेचे नेते आणि राज्याचे मंत्री संजय शिरसाट यांनी केलेल्या वक्तव्यामुळे नव्या चर्चांना उधाण आले आहे. शिरसाट यांनी दावा केला की, २०२२ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार हे राष्ट्रीय लोकशाही आघाडीसोबत (एनडीए) येण्यास इच्छुक होते. त्यांच्या या विधानामुळे राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली असून, विविध राजकीय पक्षांकडून तीव्र प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत.

विरोधी पक्षांकडून शिरसाट यांच्या दाव्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात असून, हा दावा कोणत्या आधारावर करण्यात आला, असा सवाल केला जात आहे. काही नेत्यांनी हा आरोप राजकीय हेतूने करण्यात आल्याचे म्हटले आहे. तर दुसरीकडे सत्ताधारी गटातील काही नेत्यांनी मात्र शिरसाट यांच्या विधानाला दुजोरा देण्याचा प्रयत्न केला आहे. या सर्व घडामोडींमुळे राज्यातील राजकीय वातावरण अधिक तापले असून, आगामी विधानसभा तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महायुती आणि महाविकास आघाडीतील समीकरणांवर पुन्हा एकदा चर्चा सुरू झाल्या आहेत. येत्या काळात या वक्तव्यांमुळे राजकीय घडामोडींना आणखी वेग येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### २०२३ मध्ये अजित पवार एनडीएत

जुलै २०२३ मध्ये अजित पवार महायुतीत आले आणि त्यांनी उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. शरद पवार यांनी आता निवृत्त व्हावं असंही त्यांनी म्हटलं होतं. त्यानंतर लोकसभा निवडणुकीत सुनेत्रा पवार विरुद्ध सुप्रिया सुळे असा सामना झाला. ही निवडणूक सुप्रिया सुळेंनी जिंकली. दरम्यान अजित पवार बारामतीतून २०२४ च्या विधानसभेला पुन्हा एकदा आमदार झाले. आता दोन पक्ष विलीनीकरणाच्या चर्चा सुरु झाल्या आहेत. मात्र शिरसाट यांनी वेगळाच दावा केला आहे.

### राष्ट्रवादी पक्ष एकत्र येण्याच्या चर्चा का होत आहेत?

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर सुनेत्रा पवार यांनी महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांचं विलीनीकरण होईल अजित पवारांचीच तशी इच्छा होती वगैरे चर्चा सुरु झाल्या आहेत. दरम्यान सुनील तटकरे आणि प्रफुल पटेल यांनी या चर्चा नाकारल्या आहेत. अजित पवार २०२३ मध्ये सत्तेत सहभागी झाले होते आणि एनडीएसह रहावं हीच त्यांची भूमिका होती. दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकत्र आले पाहिजेत ही भूमिका त्यांनी महापालिका निवडणूक आणि जिल्हा परिषद निवडणुकांसाठी मांडली होती असा दावा या दोन्ही नेत्यांनी केला आहे. दरम्यान संजय शिरसाट यांनी शरद पवार २०२२ मध्ये एनडीएत येणार होते सगळं काही ठरलं होतं असा दावा केला आहे.

### संजय शिरसाट काय म्हणाले?

२०२२ मध्ये एनडीएमध्ये येण्यासाठी शरद पवारांनी प्रयत्न केला होता. या गोष्टी नाकारता येणार नाहीत. कोणती खाती घ्यायची, कोणती खाती नकोत यावर सगळी चर्चा झाली होती. हे सगळं त्या काळात होतं. त्यानंतर मधल्या काळात त्यांच्या चर्चा झाल्या आहेत की नाही हे मला माहीत नाही. जोपर्यंत शरद पवार स्पष्टीकरण देत नाहीत तोपर्यंत यावर भाष्य करणं योग्य ठरणार नाही. असा दावा संजय शिरसाट यांनी केला आहे. आता याबाबत शरद पवार काही भाष्य करणार का? हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे.

# गोवा सरकारकडून स्वातंत्र्यसैनिकांच्या निवृत्तीवेतनात वाढ; ₹9,000 वरून ₹12,000

**महाईन्यूज । गोवा**

**गोवा सरकारने बुधवारी स्वातंत्र्यसैनिकांच्या मासिक निवृत्तीवेतनात वाढ करण्याचा एक महत्त्वपूर्ण निर्णय मंजूर केला. माननीय मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या स्वातंत्र्यसैनिक कल्याण समितीच्या बैठकीत स्वातंत्र्यसैनिक तसेच त्यांच्या कुटुंबीयांसाठी लाभ व सहाय्य अधिक सक्षम करण्यावर भर देण्यात आला.**



या निर्णयानुसार स्वातंत्र्यसैनिकांचे मासिक निवृत्तीवेतन आता ₹१२,००० करण्यात आले असून भत्ता ₹३,००० वरून वाढवून ₹५,००० करण्यात आला आहे. हे निर्णय स्वातंत्र्यसैनिक तसेच त्यांच्या कुटुंबीयांच्या कल्याणासाठी सरकारची कटिबद्धता दर्शवतात.

यावेळी बोलताना मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत म्हणाले, "देशाच्या स्वातंत्र्यासाठी झटलेल्या स्वातंत्र्यसैनिकांनी आपल्या स्वातंत्र्याचा पाया रचला आहे. त्यांच्या सन्मानाचे रक्षण करणे, त्यांचे कल्याण सुनिश्चित करणे आणि त्यांना तसेच त्यांच्या कुटुंबीयांना सर्व हक्काचे लाभ वेळेत व संवेदनशीलतेने उपलब्ध करून देणे, यासाठी सरकार पूर्णतः कटिबद्ध आहे."

त्यांच्या सेवा व त्यागाचा सन्मान करण्यासाठी, दिवंगत स्वातंत्र्यसैनिकांच्या अंत्यसंस्कारावेळी राज्य सरकारच्या वतीने उपजिल्हाधिकारी आणि उपअधीक्षक (पोलीस) उपस्थित राहून पुष्पचक्र अर्पण करतील, असा निर्णयही यावेळी घेण्यात आला. तसेच समितीने मांडलेल्या सर्व योग्य व रास्त बाबी संबंधित विभागांशी समन्वय साधून सोडवण्यात येतील, अशी ग्वाहीही मुख्यमंत्री डॉ. सावंत यांनी दिली.

# 'आरएसएस'च्या ध्वज यात्रेला सुरुवात

## सीईसी अहवाल फेटाळण्याचा गोवा सरकारचा प्रयत्न; वाघ संवर्धनावरून नवा वाद

महाईन्यूज । काश्मीर

**राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने (आरएसएस) आजपासून (०६ फेब्रुवारी) "काश्मीर ते कन्याकुमारी" ध्वज यात्रेला सुरुवात केली आहे. संघाच्या १०० व्या वर्धापन दिनानिमित्त श्रीनगरच्या ऐतिहासिक लाल चौकातून या यात्रेचा शुभारंभ करण्यात आला आहे. "शतक: संघाची १०० वर्षे" या चित्रपटाचा संदेश देशभर पोहोचवणे आणि आरएसएसच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि वैचारिक योगदानाची माहिती देणे हा या यात्रेचा उद्देश आहे.**



### श्रीनगर ते जम्मू पायी प्रवास

श्रीनगरमधील ऐतिहासिक लाल चौकातून या यात्रेचा शुभारंभ झाला. श्रीनगर ते जम्मू संघाच्या सदस्यांनी पायी प्रवास केला. यात स्थानिक नागरिकांनी देखील सहभाग घेतला. या चित्रपट निर्माते वीर कपूर देखील उपस्थित होते. यात्रेची सुरुवात एक मिनिट मौन पाळून करण्यात आली. यावेळी १९४७ साली काश्मीर आणि भारताच्या विलिनीकरणासाठी प्रयत्न करताना बलिदान देणाऱ्या आरएसएस सदस्य आणि भारतीय जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

### यात्रेबाबत वीर कपूर काय म्हणाले?

"यात्रेच्या माध्यमातून नागरिकांच्या मनात आरएसएसबाबत असणारे गैरसमज दूर करण्याचा आमचा प्रयत्न आहे. लोकांपर्यंत आरएसएसचा खरा इतिहास पोहोचवणे", हा आमचा उद्देश आहे, असे चित्रपटाचे निर्माते वीर कपूर म्हणाले. संघाची शंभर वर्षे साजरी करणे आणि संघाचे काम लोकांपर्यंत पोहोचवणे हा चित्रपट केल्याचेही कपूर 'द हिंदू'शी बोलताना म्हणाले.

### "शतक: संघाची १०० वर्षे" चित्रपट

काश्मीर भौगोलिक, सांस्कृतिक आणि मानसिक दृष्टीने भारताचा अविभाज्य भाग आहे. "शतक: संघाची १०० वर्षे" या चित्रपटात संघाच्या शंभर वर्षांचे काम आणि योगदान यावर भाष्य करण्यात आले आहे. आशिष माल यांनी या चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे. तर, आशिष तिवारी यांनी या चित्रपटाची सहनिर्मिती केली आहे. येत्या १९ फेब्रुवारी रोजी हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे.

# दिल्ली हादरली! उघड्या खड्ड्याने घेतला आणखी एक जीव

महाईन्यूज । दिल्ली

**दिल्लीत पुन्हा एकदा प्रशासनाच्या अनास्थेने एका तरूणाचा बळी घेतल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. पश्चिम दिल्लीत शुक्रवारी सकाळी बांधकाम सुरू असलेल्या रस्त्यावरील एका खोल खड्ड्यात पडून एका दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे.**



या दुचाकीस्वाराचे फोटो समोर आले आहेत, ज्यामध्ये त्याच्या APACHE RTR 200 ही दुचाकी खड्डयाच्या तळाशी पडलेली दिसून येत आहे. हेल्मेट घातलेला हा तरूण मृतावस्थेत बाजूला पडलेला दिसत आहे. हे फोटो सोशल मीडियावर चांगलेच व्हायरल होत आहेत. ही घटना सकाळी ७ वाजता जनकपुरी भागात उघडकीस आली.

पीटीआयने दिलेल्या वृत्तानुसार, एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने सांगितले की प्राथमिक तपासानुसार ही दुर्घटना घडली त्या जागेवर दिल्ली जल बोर्डाकडून बांधकाम केले जात असल्याचे दिसून येत आहे., आणि या जागेला व्यवस्थित बॅरिकेड लावण्यात आलेले होते. मिळालेल्या माहितीनुसार, रस्त्याच्या मधोमध हा खोल खड्डा खणण्यात आलेला आहे.

"नेमका घटनाक्रम कसा घडला हे समजून घेण्यासाठी आम्ही प्रकरणाची चौकशी करत आहोत," असे अधिकाऱ्याने सांगितले.



दिल्लीतील भाजपा सरकारने नोएडा येथील घटनेपासून कुठलाही धडा घेतला नाही अशी टीका आपचे नेते आणि माजी आमदार सौरभ भारद्वाज यांनी एक्सवर केली आहे.

दिल्ली सरकारवर टीका करत भारद्वाज यांनी लिहिले की,

"धक्कादायक!!! एक निष्पाप दुचाकी स्वार रस्त्यावरील खोल खड्डयात पडला, तेथे अडकून पडला, रात्रभर तेथे पडून राहिला आणि त्याचा मृत्यू झाला. दिल्लीतील भाजपा सरकार नोएडा येथील घटनेपासून काहीही शिकले नाही. ते फक्त दररोज खोटे बोलत राहतात. जनकपुरी जिल्हा मध्य, दिल्ली."

एकीकडे हा अपघात झाला तर दुसरीकडे पीडित तरूणाचे कुटुंबीय हे तो बेपत्ता झाल्याने अनेक डझनभर पोलीस ठाण्यांमध्ये जाऊन आले.

पीडिताचे कुटुंबीयांनी कमल याची ओळख पटवली. तसेच त्यांनी आरोप केला की त्याने आपण जनकपुरी जिल्हा मध्य या भागात असल्याचे त्यांना कळवल्यानंतर त्याच्याशी पुन्हा संपर्क होऊ शकला नाही. कुटुंबाने दावा केला की जेव्हा त्यांनी त्याच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्याचा फोन बंद लागत होता. त्याचा शोध घेताना कुटुंबाने दावा केला की त्यांनी अनेक पोलीस ठाण्यांना देखील भेटी दिल्या.

### पोलिसांनी शेअर केले पीडित तरूणाचे लोकेशन

मिळालेल्या माहितानुसार, पोलिसांनी पीडिताच्या कुटुंबीयांबरोबर त्याचे शेवटचे लोकेशन शेअर केले होते, पण तो सापडू शकला नाही. त्यानंतर काही तासांनी कुटुंबीयांना मृतदेह सापडल्याचे सांगण्यात आले. २७ वर्षीय सॉफ्टवेअर इंजिनियर युवराज मेहता याचा नोएडा येथील सेक्टर १५० मध्ये पाणी भरलेल्या खड्डयात पडून मृत्यू झाल्याची घटना १६ जानेवारी रोजी घडली होती, त्यानंतर हा प्रकार समोर आला आहे.

# मला गळ्यात मंगळसूत्र घालायचंय...

धुळ्याची लेक, मराठी मुलगी मृणाल ठाकुर आज हिंदीसह साउथ सिनेसृष्टीत डंका गाजवत आहे. मृणाल सोशल मिडियावर तरुणाईची क्रश बनली आहे. गेल्या काही दिवसांपासून तिचं नाव अभिनेता धनुषसोबत जोडण्यात येत होतं. दोघं या महिन्यात लग्न करणार अशीही चर्चा होती. मात्र यात काहीही तथ्य नसल्याचं मृणालने स्पष्ट केलं. सध्या मृणाल आगामी 'दो दीवाने शहर मे' सिनेमामुळे चर्चेत आहे. यात तिची सिद्धांत चतुर्वेदीसोबत जोडी जमली आहे. सिनेमात सध्याच्या पिढीला आपलीशी वाटेल अशी लव्हस्टोरी दाखवण्यात आली आहे. या सिनेमाच्या निमित्ताने नवभारत टाईम्सशी बोलताना मृणालने प्रेम, आकर्षण, लग्न यावर भाष्य केलं. दुसरी ते सातवीपर्यंत तिला एक मुलगा आवडत होता. पण ती इतकी लाजाळू होती की ती कधीच त्याला सांगू शकली नाही. नंतर तिच्या वडिलांची बदली झाली आणि ती दुसऱ्या शहरात गेली. लग्नाबद्दल मृणाल म्हणाली, "मला वाटतं आपले पालक लग्न कर म्हणून आपल्या मागे लागतात त्यात काही चूक नाही. लग्न वेळीच झालेलं योग्य आहे. आधी मला हे समजायचं नाही पण आता कळत आहे." "आपल्या हातांची पाच बोटं जशी एक होऊ शकत नाही तसंच आयुष्यात सगळं एकसारखं होऊ शकत नाही. आधी मी विचार करायचे की करिअर सेट करेन मग लग्न करेन. पण आता मी तसा विचार करत नाही." "आपल्या इंडस्ट्रीतच अशा कित्येक अभिनेत्री आहेत ज्यांचं लग्न झालंय, करिअरही चांगलं सुरु आहे आणि त्यांना मुलंही झाली आहेत. जर तुम्ही आत्ता लग्न करणार नाही तर मग कधी करणार?" "लग्नाचा दबाव माझ्यावरही होता. पण मी आईबाबांना एक सांगितलं होतं की करायचं म्हणून मी लग्न करणार नाही. रिलेशनशिप्समध्येही मी कधीच रिजेक्ट झाले नाही. एकमेकांच्या सहमतीने आम्ही वेगळे झालो. पण प्रेमात नकार मिळण्याची वेळ कधी आली नाही. "मी आजही प्रेमाच्या शोधात आहे. लग्न करायचं ही तर माझी लहानपणापासूनची इच्छा आहे. लाल लेहेंगा, लाल बांगड्या घालून तयार व्हायचं आहे. भांगेत सिंदूर भरायचं आहे. मंगळसूत्र घालायचं आहे. मला वाटतं ही प्रत्येक मुलीची इच्छा असते फक्त तसा जोडीदार मिळायला हवा ज्याच्याकडून बघून वाटलं पाहिजे की हो, हाच तो!"




# तलविंदर सिंहला DATE करतेय 'दिशा'

अलिकडेच नुपूर सेनॉन या अभिनेत्रीचा विवाहसोहळा पार पडला असून यात अनेक दिग्गज कलाकार सामील झाले. परंतु यादरम्यान दिशा पाटनी आणि गायक तलविंदर सिंह यांच्यातील केमिस्ट्रीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. सोहळ्यात दिशा पाटनी आणि मौनी रॉय यांची मैत्री दिसून आली, परंतु येथे तलविंदरसोबत दिशाची खास बॉन्डिंग दिसून आली, ज्याची चर्चा आता सोशलमीडियावर होत आहे. दिशा आणि तलविंदर हे परस्परांसोबत संभाषण करताना दिसून आले असून यावेळी दिशा तलविंदरचा हात हातात घेऊन असल्याचे दृश्य कॅमेऱ्यात टिपले गेले आहे. तलविंदर हा पहिल्यांदाच मुखवट्याशिवाय दिसून आल्याने देखील त्याचे चाहते चकित झाले आहेत. यात त्याचा चेहरा स्पष्टपणे दिसून येत आहे. तलविंदर सिंह हा प्रख्यात पंजाबी गायक आहे. अलिकडेच त्याने कार्तिक आर्यनच्या चित्रपटातील एका गाण्याला आवाज दिला होता, ज्याला मोठी पसंती मिळाली होती. इंटरनेटवर तलविंदरची मोठी फॅन फॉलोइंग असून आता दिशाचे नाव त्याच्यासोबत जोडले जात आहे. काही दिवसांपूर्वी दिशाला एका कारमध्ये एका मिस्ट्री मॅनसोबत पाहिले गेले होते, ज्यात त्याचा चेहरा स्पष्टपणे दिसून आला नव्हता.



# 'स्क्विड गेम' फेम वी हाजुन 'साइरंस किस'मध्ये दिसणार

सध्या भारतीय प्रेक्षक कोरियन सीरिज मोठ्या संख्येत पाहत आहेत. अशा स्थितीत अनेक स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्मवर कोरियन सीरिज स्ट्रीम होत असतात. लवकरच एक सीरिज 'साइरंस किस'ही प्रेक्षक पाहू शकतील. यात स्क्विड गेम फेम वी हाजुन दिसून येणार आहे. साइरंस किस सीरिजमध्ये 'कॉन्फिडेन्स क्वीन' फेम पार्क मिनयंग देखील मुख्य भूमिकेत असणार आहे. सीरिजमध्ये ध्यास अन् फसवणुकीची कहाणी असणार आहे. ही एक रोमँटिक, थ्रिलर धाटणीची सीरिज असून यात एक इंशोरेन्स फ्रॉड इन्व्हेस्टिगेशन युनिटच्या कुशाग्र इन्व्हेस्टिगेटरची भूमिका वी हाजुनने साकारली आहे. एका तपासादरम्यान त्याला एका युवतीवर संशय येतो. या युवतीची भूमिका पार्क मिनयंगने साकारली आहे. 'साइरंस किस' या सीरिजचे दिग्दर्शन किम चेओलग्यूने केले आहे. किमने यापूर्वी फ्लॉवर ऑफ एविल, सेलिब्रिटी, शिकागो टाइपरायटर आणि मदर यासारख्या सीरिज दिग्दर्शित केल्या आहेत. यावेळी तो रोमान्ससोबत थ्रिलर धाटणीच्या कहाणीकरता कौशल्य दाखवून देणार आहे. ही कोरियन सीरिज अमेझॉन प्राइम व्हिडिओवर 2 मार्चपासून स्ट्रीम होणार आहे.



# पत्नीने काढलेलं घराबाहेर 'तो' किस्सा सांगत म्हणाला, "माझी बायको..."

कोविड्या काळात अनेक सेलिब्रिटी घरी बसून होते. काहींना तर त्यानंतरही बराच काळ कामं मिळत नव्हती, त्यामुळे तो काळ त्यांच्यासाठी कठीण होता. असंच काहीसं घडलं लोकप्रिय अभिनेता आर. माधवनबरोबर. परंतु, यावेळी त्याच्या पत्नीने त्याला समजावून सांगितलं आणि त्याला यातून बाहेर काढलं. आर. माधवन बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेता आहे. त्याला प्रेमाने त्याचे चाहते मॅडी म्हणतात. आतापर्यंत त्याने विविध चित्रपटांत काम करत त्याच्या सहजसुंदर अभिनयाने प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत. आर. माधवन अनेकदा मुलाखतींमधून मोकळा संवाद साधताना दिसतो. अशातच नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत त्याने त्याच्या पत्नीबद्दल सांगितलं आहे. कोविडच्या काळात पत्नीने कसं प्रोत्साहन दिलं, याबद्दल त्याने अनफिल्टर एंटर्टेमेंटशी संवाद साधताना सांगितलं आहे. अभिनेता नेमकं काय म्हणाला सविस्तर जाणून घेऊयात... आर. माधवन म्हणाला, "माझी बायको म्हणते तू कधीच कामातून बाहेर येऊ शकणार नाही. तू तमिळ कॉमेडी, ॲक्शन, ओटीटी, हिंदी ॲक्शन, इंग्लीश ओटीटी या सगळ्या माध्यमांवर काम करत असतोस, त्यामुळे तू घरी आहेस हे पाहून मला आश्चर्य वाटतंय. कोविड २०२० दरम्यान तिने मला घराबाहेर काढलं आणि म्हणाली, बाहेर जाऊन काम कर आणि पैसे कमाव." आर. माधवन याने पुढे त्याची मानसिक स्थिती समजून घेतल्यामुळे त्याच्या पत्नीचे आभार मानले. तो म्हणाला, "एक दिवस माझ्या बायकोने मला विचारलं की तुला काय झालं आहे? ती म्हणाली की तू घरी पुन्हा येण्यासाठी कामावर जात आहेस असं वाटतंय. ते ऐकून मी विचारात पडलो." मला तिचं म्हणणं पटलं.



# हर्षित राणा दुखापतीमुळे स्पर्धेबाहेर?

## दुखापतीमुळे संघरचनेत बदल; सिराजला संधी मिळण्याची शक्यता

महाईन्यूज । मुंबई

**भारत आणि श्रीलंका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित टी-२० विश्वचषक २०२६ चा थरार उद्या, ७ फेब्रुवारीपासून सुरू होत आहे. मात्र, या अत्यंत महत्त्वाच्या स्पर्धेच्या उंबरठ्यावर भारतीय संघाला मोठा धक्का बसण्याची चिन्हे आहेत. वेगवान गोलंदाज हर्षित राणा दुखापतीमुळे या संपूर्ण स्पर्धेतून बाहेर पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे.**

### प्रेस कॉन्फरन्समध्ये सूर्याने दिले संकेत

सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ शनिवारी मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर मैदानात उतरेल. या सामन्याच्या पूर्वसंध्येला आयोजित पत्रकार परिषदेत कर्णधाराने हर्षित राणाच्या फिटनेसबाबत मोठे भाष्य केले. सूर्यकुमार म्हणाला, 'हर्षित अद्याप स्पर्धेतून पूर्णपणे बाहेर झालेला नाही, मात्र त्याच्या खेळण्यावर शंका आहे. आज संध्याकाळपर्यंत चित्र स्पष्ट होईल. बुधवारी झालेल्या सराव सामन्यात त्याला दुखापत झाली होती, पण सद्यस्थिती फारशी आशादायक नाही.'




### गुडघ्याच्या दुखापतीने वाढवली डोकेदुखी

विश्वचषकापूर्वी सराव करण्यासाठी भारताने ४ फेब्रुवारी रोजी दक्षिण आफ्रिकेविरुद्ध नवी मुंबईतील डॉ. डी. वाय. पाटील स्पोर्ट्स अकादमीमध्ये सामना खेळला होता. या सामन्यात केवळ एक षटक टाकल्यानंतर हर्षितला उजव्या गुडघ्यात तीव्र वेदना जाणवू लागल्या, ज्यामुळे त्याला तातडीने मैदान सोडावे लागले. तेव्हापासून त्याच्या सहभागाबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात होते. कर्णधाराच्या ताज्या विधानानंतर, हर्षितचे विश्वचषकातील आव्हान संपुष्टात आल्याचे जवळपास निश्चित मानले जात आहे.

### विजयारंभ करण्यास भारत सज्ज

गतविजेता भारतीय संघ ७ फेब्रुवारी रोजी भारतीय वेळेनुसार सायंकाळी ७ वाजता अमेरिकेविरुद्ध भिडणार आहे. 'ग्रुप-ए' मध्ये असलेल्या भारतासाठी सुरुवातीचे सामने अत्यंत महत्त्वाचे आहेत. अमेरिकेनंतर १२ फेब्रुवारीला नामिबिया आणि त्यानंतर १५ फेब्रुवारीला कोलंबोच्या मैदानावर कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तान विरुद्ध महामुकाबला होणार आहे. या हाय-व्होल्टेज सामन्याची जगभरातील क्रिकेटप्रेमी आतुरतेने वाट पाहत आहेत. अशा स्थितीत हर्षित राणासारखा प्रभावी गोलंदाज बाहेर जाणे हा भारतासाठी मोठा तांत्रिक धक्का ठरू शकतो.

# भारत- पाकिस्तान संघ उतरणार मैदानात; केव्हा, कुठे अन् किती वाजता सुरू होणार सामने?

महाईन्यूज । मुंबई

**आयसीसी टी-२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेचा बिगुल वाजला आहे. ही स्पर्धा सुरू व्हायला अवघे काही तास शिल्ल राहिले आहेत. स्पर्धेतील पहिल्या दिवशी ३ सामने खेळवले जाणार आहेत. शनिवारचा पूर्ण दिवस हा क्रिकेट चाहत्यांसाठी मेजवानी असणार आहे. पहिल्याच दिवशी भारत-पाकिस्तान आणि वेस्ट इंडिज हे तिन्ही बलाढ्य संघ खेळण्यासाठी उतरणार आहेत.**




या स्पर्धेचे आयोजन भारत आणि श्रीलंकेत केले जाणार आहे. स्पर्धेतील पहिल्या सामन्यात पाकिस्तानचा सामना नेदरलँडविरूद्ध होणार आहे. हा या स्पर्धेतील उद्घाटनाचा सामना असणार आहे. हा सामना भारतीय वेळेनुसार सकाळी ११ वाजता सुरू होईल. हा सामना कोलंबोतील सिंहली स्पोर्ट्स क्लबमध्ये खेळवला जाणार आहे. हा ग्रुप ए मधील पहिलाच सामना असणार आहे. पहिला सामना झाल्यानंतर स्पर्धेतील दुसऱ्या सामन्यात वेस्ट इंडिजचा सामना स्कॉटलँडविरूद्ध होणार आहे. ठरलेल्या वेळापत्रकानुसार हा सामना वेस्ट इंडिज आणि बांगलादेश या दोन्ही संघांमध्ये होणार होता. पण बांगलादेशने या स्पर्धेतून माघार घेतली आहे. त्यामुळे स्कॉटलँड संघाचा या स्पर्धेत समावेश करण्यात आला आहे. हा सामना कोलकात्यातील इडन गार्डन्सच्या मैदानावर खेळवला जाणार आहे. हा सामना भारतीय वेळेनुसार दुपारी ३ वाजता सुरू होणार आहे. पाकिस्तान आणि नेदरलँड यांच्यात होणारा सामना संपल्यानंतर हा दुसरा सामना सुरू होईल.

तर मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर पहिल्या दिवसातील तिसरा सामना खेळवला जाणार आहे. या सामन्यात भारत आणि अमेरिका हे दोन्ही संघ आमनेसामने येणार आहेत. हा सामना भारतीय वेळेनुसार संध्याकाळी ७ वाजता सुरू होणार आहे. भारतीय खेळाडूंनी याच मैदानावर कसून सराव केला आहे. तसेच बहुतांश खेळाडूंना या मैदानावर खेळण्याचा चांगलाच अनुभव आहे. त्यामुळे या सामन्यात भारतीय संघाचा पारडं जड असणार आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज ™
epaper.mahaenews.com
ePaper
। शनिवार ।
दि. 07 फेब्रुवारी 2026।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## हीच सत्ताधारी भाजपाची त्रिसूत्री : आमदार महेश लांडगे

# निष्ठा - समर्पण - शाश्वत विकास



“निष्ठा-समर्पण आणि शाश्वत विकास ही भारतीय जनता पार्टीच्या पदाधिकाऱ्यांच्या कामाची त्रिसूत्री असेल. त्या अनुशंगाने आम्ही सर्वजण एकजुटीने पिंपरी-चिंचवडच्या शाश्वत विकासासाठी कटिबद्ध आहोत. भारतीय संविधान आणि देव-देश-धर्म-संस्कृती संवर्धनाचा संकल्प आहे. आगामी काळात पिंपरी-चिंचवड शहर देशातील विकसित शहरांमध्ये नंबर- 1 राहील. हे दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे स्वप्न होते. ते स्वप्न पूर्ण करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सकारात्मक भूमिकेतून काम करण्याचा संकल्प करीत आहोत.

**– महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

“पिंपरी- चिंचवड पालिकेची ३ वर्ष १० महिने २४ दिवसांची प्रशासकीय राजवट आज महापौर रवी लांडगे आणि उपमहापौर शर्मिला बाबर यांच्या निवडीनंतर संपुष्टात आली आहे. यापुढील काळात नवनिर्वाचित महापौर व उपमहापौर सभागृहाचे कामकाज शिस्तबद्ध, पारदर्शक व लोकाभिमुख राहील, प्रत्येक सदस्याला समान संधी मिळेल आणि शहराच्या प्रगतीचा वेग अधिक वाढेल असे काम करतील. भाजपाला नागरिकांच्या पाठिंब्याने मोठे यश मिळाले आहे. नागरिकांनी दिलेला हा विश्वास हे सभागृह सार्थ ठरवेल असा विश्वास आहे.

**– शंकर जगताप, आमदार, चिंचवड, पुणे.**

“महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली हे नवीन सभागृह शहराच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देईल. सभागृहात मतभेद असू शकतात, पण मनभेद न ठेवता शहराच्या विकासासाठी आम्ही सर्व एकत्र काम करू.

**– प्रशांत शितोळे, सत्तारुढ पक्षनेता, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**भारतीय जनता पार्टीचे बिनविरोध नगरसेवक रवि लांडगे यांनी महापौरपदी बिनविरोध निवड झाली. भाजपाचे निष्ठावंत व शहराचे माजी विरोधी पक्षनेते कै. बाबासाहेब लांडगे, भाजपाचे नेते दिवंगत कै. अंकुशराव लांडगे कुटुंबियांनी भारतीय जनता पार्टी आणि शहरासाठी समर्पण भावनेतून काम केले आहे. आज त्यांच्या कार्याला खऱ्या अर्थाने श्रद्धांजली मिळाली आहे. तसेच, सर्वसामान्य कार्यकर्ता आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघासाठी समर्पित भावनेतून काम करणाऱ्या बाबर कुटुंबियांतील शर्मिला बाबर यांची उपमहापौरपदी बिनविरोध निवड होत आहे.**

## संविधानाची प्रत भेट...

भाजपाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, नगरसेवक, हितचिंतक यांना विनंती करतो की, लोकनेते दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अकाली निधन झाले.त्याला आजून 12 दिवसही झालेले नाही. त्यामुळे आपण राजकीय संवेदनशीलता म्हणून कोणताही आनंदोत्सव साजरा करणार नाही. त्या अनुशंगाने सर्वांनी दक्षता घ्यावी. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी आम्ही काम करीत आहोत. त्यामुळे नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना “भारतीय संविधान”ची पत्र देवून शुभेच्छा दिल्या.



ही किमया फक्त भारतीय जनता पार्टीतच शक्य आहे, असे मला वाटते, अशा भावना भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केल्या आहेत. पिंपरी-चिंचवडच्या महापौरपदी भारतीय जनता पार्टीचे रवि बाबासाहेब लांडगे यांची निवड झाली, तर उपमहापौरपदी शर्मिला बाबर यांची बिनविरोध निवड झाली. राष्ट्रवादीच्या वैशाली काळभोर यांनी आपला अर्ज मागे घेतला. सुमारे 4 वर्षांच्या प्रशासकीय काळानंतर महापालिका सभागृहात पहिली बैठक झाली. या बैठकीत महापौर, उपमहापौर, विरोधी पक्षनेते, सत्तारुढ पक्षनेते यांची निवड करण्यात आली.

यावेळी भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, आमदार शंकर जगताप, विधान परिषदेच्या आमदार उमा खापरे, विधान परिषदेचे आमदार अमित गोरखे उपस्थित होते.

आमदार महेश लांडगे म्हणाले की, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पिंपरी-चिंचवड शहराच्या “शाश्वत विकासासाठी” आम्ही सर्वजण कटिबद्ध आहोत. नवनिर्वाचित महापौर रवि लांडगे यांच्यासह सर्व प्रमुख पदाधिकारी, नगरसेवक यांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो. 4 वर्षांच्या प्रशासकीय राजवटीनंतर पहिल्यांच सभागृहाचे कामकाज आज सुरू झाले, याचे मनोमन समाधान आहे.

# 1970 नंतर पहिल्यांदाच घुमानमध्ये घुमला कीर्तनाचा आवाज!

## शिक्षण विश्व: घुमान- पंजाब येथे संतपीठाचा अभ्यास दौरा

**महाईन्यूज ।**
**पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतपीठ यांच्या वतीने पंजाब घुमान येथे एक विशेष अभ्यास दौरा आयोजित केला गेला.**



या अभ्यास दौऱ्यामध्ये पिंपरी चिंचवड महानगर पालिकेचे उपायुक्त व संतपीठाचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री संदीप खोत, शिक्षणाधिकारी व संतपीठाच्या सेक्रेटरी सौ संगीता बांगर, संतपीठच्या संचालिका डॉ. सौ स्वाती मुळे, संचालक ह. भ. प. श्री राजु महाराज ढोरे, तसेच प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर गाडगे यांच्या सह भाषा, समाजशास्त्र, संगीत आणि कला विषयाचे शिक्षक सहभागी झाले.

अभ्यास दौऱ्यादरम्यान सहभागी शिक्षकांनी घुमान इंटरनॅशनल पब्लिक स्कूल, बाबा नामदेवजी गव्हर्नमेंट डिग्री कॉलेज, बाबा आया सिंग रिअरकी कॉलेज या ठिकाणी भेटी देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला आणि शैक्षणिक व्यवस्थेचा अभ्यास केला.



### संतशिरोमनी नामदेव महाराजांचे स्मरण...

यावेळी महाराष्ट्रातील वारकरी परंपरेनुसार पहिल्यांदाच हिंदी कीर्तन सेवा संत शिरोमणी नामदेव महाराजांच्या मंदिरात पार पडली. यापूर्वी 1970 साली फक्त मंदिरासमोरच सप्ताह केला गेला होता. कीर्तन सेवेसाठी पखावज व संगीत अलंकार महेश शेळके व अविनाश भोगील यांनी केले, हार्मोनियम वादनासाठी संगीत विशारद चंद्रकांत गोसावी उपस्थित होते, तर गायन साथ संगीत अलंकार श्री विलास कोकाटे यांनी केला. कीर्तन सेवेत पिंपरी चिंचवड महानगर पालिकेचे उपायुक्त श्री संदीप खोत, प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर गाडगे तसेच सर्व शिक्षक उपस्थित होते. संतपीठाच्या माध्यमातून या प्रकारच्या अभ्यास दौऱ्यांनी शिक्षकांना शैक्षणिक तसेच सांस्कृतिक दृष्ट्या अमूल्य अनुभव मिळवून दिला असून भविष्यात अशा कार्यक्रमांचे आयोजन नियमित करण्याची योजना आहे.

संध्याकाळी घुमान येथील संत नामदेव महाराज मंदिर मध्ये संतपीठाचे संचालक ह. भ. प. श्री राजु महाराज ढोरे यांनी संत शिरोमणी नामदेव महाराज यांच्या अभंगावर "तु अगाध वैकुंठनायका | तेरे चरणो मेरा माथा" कीर्तन केले. या अभंगाच्या माध्यमातून विविध सांप्रदायिक दृष्टांत स्पष्ट केले गेले आणि प्रत्येक चरणाचा अर्थ समजावून सांगितला.

# स्थैर्य, विकास अन् विकासाची वाटचाल हाच संकल्प!

## भाजपा शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न काटे

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**नवनिर्वाचित महापौर रवी लांडगे आणि उपमहापौर शर्मिला बाबर यांच्या बिनविरोध निवडीनंतर पिंपरी चिंचवड शहरात स्थैर्य आणि विकासाचा नवा अध्याय सुरू झाला असून, भाजपाच्या सक्षम नेतृत्वामुळे शहराचा सर्वांगीण विकास अधिक वेगाने साध्य होईल, असा ठाम विश्वास भाजपा शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न काटे यांनी व्यक्त केला.**



दीर्घकाळ चाललेल्या प्रशासकीय राजवटीनंतर लोकनियुक्त प्रतिनिधींच्या हाती पुन्हा शहराचा कारभार येणे ही नागरिकांसाठी दिलासादायक बाब असल्याचे काटे यांनी सांगितले. सभागृहाचे कामकाज शिस्तबद्ध, पारदर्शक आणि लोकाभिमुख राहील, यासाठी भाजपा कटिबद्ध आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. पिंपरी चिंचवडच्या औद्योगिक, आयटी, मेट्रो, शिक्षण आणि पायाभूत सुविधांच्या विकासाला अधिक गती देत नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित प्रश्न प्राधान्याने सोडवले जातील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे म्हणाले, "पिंपरी चिंचवड हे राज्यातीलच नव्हे तर देशातील एक आदर्श शहर म्हणून ओळखले जाते. नियोजनबद्ध विकास, सक्षम प्रशासन आणि लोकाभिमुख धोरणे यामुळे हे शहर सातत्याने पुढे जात आहे. महापौर व उपमहापौर यांच्या नेतृत्वाखाली सभागृहाचे कामकाज अधिक शिस्तबद्ध, पारदर्शक आणि प्रभावी होईल." "नागरिकांनी भाजपावर दाखवलेला विश्वास ही आमची जबाबदारी आहे. हा विश्वास सार्थ ठरवण्यासाठी महापौर, उपमहापौर, लोकप्रतिनिधी आणि संघटना एकसंघपणे काम करेल. पिंपरी चिंचवडचा विकास हा केवळ आश्वासन न राहता प्रत्यक्ष अनुभव ठरेल, असेही काटे म्हणाले.



> नागरिकांनी आम्हांवर दाखवलेला विश्वास हा आमच्या नेतृत्वाची खरी जबाबदारी आहे. महापौर रवी लांडगे आणि उपमहापौर शर्मिला बाबर यांच्या नेतृत्वाखाली महापालिकेचे कामकाज पूर्णपणे शिस्तबद्ध, पारदर्शक आणि लोकाभिमुख राहील. प्रत्येक निर्णय, प्रत्येक प्रकल्प आणि प्रत्येक सेवा नागरिकांच्या हिताला केंद्रस्थानी ठेवूनच घेण्यात येईल. पिंपरी चिंचवडचा विकास केवळ औद्योगिक किंवा आर्थिक प्रगतीपुरता मर्यादित राहणार नाही; प्रत्येक प्रभाग, प्रत्येक वस्ती आणि प्रत्येक नागरिक विकासाचा प्रत्यक्ष लाभ अनुभवेल. मतभेद असले तरी सभागृहातील सहकार्य आणि सहमती शहराच्या प्रगतीसाठी बाधक ठरणार नाही, आणि हे नेतृत्व आपल्या महानगराला आधुनिक, सुरक्षित आणि विकासशील शहर बनवण्यासाठी कटिबद्ध आहे.
>
> – **शत्रुघ्न काटे,** शहराध्यक्ष तथा नगरसेवक, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# राज्यस्तरीय शालेय युनिफाईट स्पर्धेत थेरगावच्या 'न्यू इंग्लिश मीडियम स्कूल'चे यश

## शिक्षण विश्व : चिन्मय मस्केला सुवर्ण, तर उत्तम भाटीला कांस्य पदक

**महाईन्यूज ।**
**पिंपरी-चिंचवड**

**क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत पनवेल येथे आयोजित ४ आणि ५ फेब्रुवारी रोजी पार पडलेल्या राज्यस्तरीय शालेय युनिफाईट स्पर्धेत थेरगाव येथील न्यू इंग्लिश मीडियम स्कूलच्या खेळाडूंनी देदिप्यमान यश संपादन केले आहे. या स्पर्धेत शाळेच्या चिन्मय मस्के याने सुवर्ण पदक, तर उत्तम भाटी याने कांस्य पदक पटकावून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.**




दोन्ही खेळाडूंनी आपल्या कौशल्यपूर्ण खेळाचे प्रदर्शन करत राज्यस्तरावर ही पदे मिळवली. त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री. विजय पवार, सचिव अशोक मोरे, खजिनदार सुरेखा पवार, मुख्याध्यापिका विद्या नाईक व नायगम एग्निस तसेच संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी खेळाडूंचे विशेष कौतुक केले.

या प्रसंगी श्री. विजय पवार यांनी यशस्वी खेळाडूंचे अभिनंदन करतानाच शाळेतील इतर विद्यार्थ्यांनाही मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, "विद्यार्थ्यांनी केवळ अभ्यासातच नव्हे, तर क्रीडा क्षेत्रातही आपली ओळख निर्माण करावी. शिक्षण आणि खेळ यांची योग्य सांगड घातल्यास एक यशस्वी खेळाडू आणि उत्तम व्यक्तिमत्व घडवता येते."

हे दोन्ही खेळाडू प्रशिक्षक यशवंत माने यांच्या मार्गदर्शनाखाली नियमित सराव करतात. माने यांनीही खेळाडूंच्या मेहनतीचे कौतुक करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

> आमच्या शाळेतील चिन्मय आणि उत्तम या खेळाडूंनी राज्यस्तरावर मिळवलेले यश हे त्यांच्या जिद्दीचे आणि मेहनतीचे फळ आहे. आजच्या स्पर्धेच्या युगात केवळ पुस्तकी ज्ञान पुरेसे नाही, तर शारीरिक आणि मानसिक सुदृढतेसाठी खेळांची नितांत गरज आहे. शिक्षणासोबतच खेळाची सांगड घातल्यास विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो आणि एक शिस्तबद्ध आयुष्य जगण्याची सवय लागते. शाळेतील इतर विद्यार्थ्यांनीही या खेळाडूंचा आदर्श घेऊन क्रीडा क्षेत्रात भरारी घ्यावी, हीच आमची इच्छा आहे. संस्थेच्या वतीने आम्ही खेळाडूंना नेहमीच असेच प्रोत्साहन देत राहू.
>
> **- विजय पवार,** संस्थापक अध्यक्ष, न्यू इंग्लिश मीडियम स्कूल, थेरगाव.

# राष्ट्रीय फार्मसी सप्ताहानिमित्त पदवीपूर्व स्तरावरील फार्मा अॅड-मॅड स्पर्धेचे आयोजन

**महाईन्यूज ।**
**पुणे**

**६४ व्या राष्ट्रीय फार्मसी सप्ताहानिमित्त राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळाचे कॉलेज ऑफ फार्मसी, येथे इंडियन फार्मास्युटिकल असोसिएशन (IPA) यांच्या सहकार्याने पदवीपूर्व स्तरावरील फार्मा अॅड-मॅड स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात आले.**



या स्पर्धेसाठी १८ फार्मसी महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांनी फार्मसी, आरोग्यसेवा व सामाजिक जाणीव यांवर आधारित नाविन्यपूर्ण जाहिराती सादर करून आपली सर्जनशीलता, संवादकौशल्य, संघभावना व व्यावसायिक जाणीव प्रभावीपणे व्यक्त केली.

कार्यक्रमाचे आयोजन संस्थेच्या व्यवस्थापन व प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. स्पर्धेचे यशस्वी समन्वयक म्हणून प्रा. नीलाक्षी नेरकर व प्रा. निकिता निकम यांनी जबाबदारी पार पाडली. यासाठी प्राध्यापकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी स्वयंसेवकांनी मोलाचे सहकार्य केले.

या स्पर्धेचे परीक्षण डॉ. विकास शेंडे व प्रा. रुचा पुसेगावकर यांनी परीक्षक म्हणून केले. मान्यवर परीक्षकांनी स्पर्धकांच्या सादरीकरणाचे परीक्षण करून विद्यार्थ्यांना मौल्यवान मार्गदर्शन केले, ज्यामुळे विद्यार्थ्यांना मोठी प्रेरणा मिळाली. या स्पर्धेत मॉडर्न कॉलेज ऑफ फार्मसी, निगडी, यांनी प्रथम क्रमांक पटकावला, तर एम.एम. कॉलेज ऑफ फार्मसीने उपविजेतेपद मिळवले.

या कार्यक्रमास कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. अमोल कुंभार यांनी संबोधित केले. तसेच व्यवस्थापन प्रतिनिधी प्रा. किरण चौधरी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष व भोसरी विधानसभेचे प्रथम आमदार श्री. विलासराव लांडे, सचिव मा. श्री. सुधीर मुंगसे, खजिनदार श्री. अजित दा. गव्हाणे, तसेच विश्वस्त श्री. विक्रांत लांडे व श्री. सुमित मुंगसे यांनी उपस्थित राहून यशस्वी आयोजनाबद्दल आयोजकांचे अभिनंदन केले.

या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांमधील सर्जनशीलतेला चालना मिळाली तसेच सार्वजनिक आरोग्य व समाजजागृतीमध्ये फार्मासिस्टची भूमिका अधोरेखित झाली. सहभागी सर्व संघ व आयोजकांच्या कौतुकासह कार्यक्रमाची यशस्वी सांगता झाली.




# Why Emotional Support Matters as Much as Academic Teaching in Primary Education: Ms. Laxmi More

**AS A PRIMARY TEACHER, I MEET YOUNG CHILDREN AT A VERY IMPORTANT STAGE OF THEIR LIVES. FOR MANY OF THEM, SCHOOL IS THEIR FIRST EXPERIENCE AWAY FROM HOME. THEY WALK INTO THE CLASSROOM CARRYING CURIOSITY, EXCITEMENT, FEAR, AND SOMETIMES TEARS. AT THIS STAGE, TEACHING IS NOT LIMITED TO ALPHABETS, NUMBERS, OR TEXTBOOK LESSONS. IT ALSO INVOLVES UNDERSTANDING EMOTIONS AND RESPONDING WITH CARE.**



In primary classrooms, emotional security forms the foundation of learning. A child who feels safe and accepted is more willing to speak, ask questions, and participate in activities. On the other hand, a child who feels scared, ignored, or constantly corrected becomes silent and withdrawn. From my classroom experience, I have learned that learning begins only when a child feels emotionally supported.

Many learning challenges at the primary level are misunderstood as lack of ability. In reality, they often arise from fear of making mistakes or low self-confidence. When children are scolded or compared with others, they begin to associate learning with anxiety. However, when teachers appreciate effort, correct mistakes gently, and encourage improvement, children develop confidence and interest in learning.

Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE

Primary teachers also work under several limitations such as large class sizes, time-bound schedules, and curriculum pressure. Despite these challenges, emotional support does not require extra resources. Simple classroom practices—calling children by their names, listening patiently, acknowledging small progress, and maintaining a warm tone—make a significant difference. These small acts help children feel noticed and valued.

Emotional support also plays a vital role in shaping behaviour. Children who feel understood are more cooperative and disciplined. Instead of fear-based discipline, empathetic guidance helps children understand right behaviour and develop self-control. This approach strengthens the teacher–student bond and creates a positive learning environment.

Education in the primary years should aim to build confidence, curiosity, and emotional strength. Academic skills can be developed gradually, but emotional security must be nurtured from the beginning. When teachers balance academic teaching with emotional support, they do more than teach lessons—they shape young minds and hearts.

**Why is emotional support crucial in primary classrooms?**

Emotional support is crucial in primary classrooms because young children are emotionally sensitive and still developing self-confidence. When children feel safe, accepted, and encouraged, they become more open to learning, participation, and social interaction. Emotional security helps reduce fear and builds a positive attitude towards school.

**How can primary teachers balance emotional support with academic teaching?**

Primary teachers can balance both by integrating emotional support into daily teaching. Using kind language, appreciating effort, correcting mistakes gently, and encouraging participation help children feel confident while learning. Emotional support does not reduce academic focus; it strengthens children's ability to learn effectively.

**Ms. Laxmi More**
**Primary teacher/educator**
**Priyadarshani School, Moshi**